JO



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा  **P.S.(ठाणे):** म्हसवड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0251  **Year (वर्ष):** 2022

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**24/11/2022 03:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 23/11/2022
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/11/2022
   **Time From (वेळेपासून):** 16:15 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 24/11/2022  **Time (वेळ):** 03:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/11/2022 03:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** म्हसवड शहरातील कषि उत्पन्न बा,माण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अंबादास बाबा नरळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पर्यंती, माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पर्यंती, माण,म्हसवड ,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9322842458

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश रामभाऊ जगदाळे | | | 1. राणंद,माण ,म्हसवड ,सातारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 23/11/2022

मी, अंबादास बाबा नरळे, वय 50 वर्षे, शिक्षण - 7 वी, व्यवसाय - शेती, राहणार - मु. पो. पर्यंती, ता. माण, जि. सातारा. मोबाईल नंबर - 9322842458 (जिओ).

समक्ष म्हसवड पोलीस स्टेशन मध्ये हजर होवून खबरी जबाब देतो की, "मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासमवेत राहणेस आहे. मी गावी शेती करीत असुन मला मराठी, हिदी व मराठी भाषेचे ज्ञान आहे. मी यापुर्वी टेलरिंग व्यवसाय केलेला असल्याने मी म्हसवड येथे माझे स्वत:चे टेलरिंगचे व कपडयाचे दुकान टाकण्याचे ठरविले.

म्हसवड शहरामधील पर्यंती - शंभुखेड जाणाऱ्या रस्त्यावर माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उपसमिती म्हसवड यांचेकडुन नविन व्यापारी गाळ्यांचे बांधकाम चालु करणार असल्याचे मला समजले त्यामुळे मी माझे टेलरिंगचे व कपडयांचे दुकान सदरच्या व्यापारी गाळ्यांमध्ये टाकण्याचे ठरवुन मी माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड येथील सचिव जगदाळे यांची मागील आठवडयामध्ये भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, "व्यापारी गाळ्याचे बांधकाम चालु असुन तुमाला गाळा पाहीजे असल तर, समितीने ठरवुन दिल्याप्रमाणे 5 लाख रुपये तुमचे गाळ्याचे डिपॉझीट, प्रत्येक महिन्याचे भाडे 1300/- रुपये, आणी माझे चहापाण्याचे 50,000/- रुपये तुमाला द्यावे लागतील तरच तुमाला मी गाळा देईन, आणि पहिला गाळा मिळण्याचा तुमचा एक अर्ज द्या" असे मला सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन तेथुन निघुन आलो.

त्यानंतर मी ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयात माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी यांचे म्हसवड उपबाजार समिती येथील सचिव जगदाळे यांचे विरुद्ध तक्रार देण्याचे ठरवुन मी ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयात दिनांक 22/11/2022 रोजी संपर्क साधुन माझी तक्रार असल्याचे सांगुन मी दिनांक 23/11/2022 रोजी त्यांना भेटण्यास माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड येथे जाणार असल्याचे कळविले. त्यावेळी श्री. राऊत साहेब, पोलीस निरीक्षक यांनी मला दिनांक 23/11/2022 रोजी 11:00 वा. म्हसवड शहराचे अलीकडे मायणी चौकाचे जवळ रस्त्याचे कडेला आडोशास थांबण्याची सुचना दिली.

दरम्यान आज दिनांक 23/11/2022 रोजी सकाळी मी समक्ष माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उप बाजार समिती म्हसवड येथे जावुन सचिव जगदाळे यांना मला गाळा मिळणेबाबतचा अर्ज दिला. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, "मी आज चार वाजेपर्यंत आहे, तुमी डीपॉझीटची रक्कम भरा, आणी माझे 50,000/- रुपये चहापाण्याचे द्या, आणी लवकर या" असे मला सांगितले.

त्यानंतर श्री. राऊत साहेब, पोलीस निरीक्षक यांनी दिनांक 23/11/2022 रोजी म्हसवड शहराचे अलीकडे मायणी चौकाचे जवळ रस्त्याचे कडेला आडोशास 11:30 वाजता येवुन माझ्याशी संपर्क साधुन मला त्या ठिकाणी बोलावुन घेतले. त्यावेळी श्री. राऊत साहेब, त्यांचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये हजर होते. त्याठिकाणी श्री. राऊत साहेबांनी, माझी व पंचायत समिती, कोरेगाव येथील 1) काशिनाथ गोविंद शिंदे, वरिष्ठ सहायक व 2) संदेश गुलाब पिसे, कनिष्ठ लेखाधीकारी या दोन शासकिय पंचांसह व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझा तक्रारी अर्ज राऊत साहेबांकडे हजर केला. त्याचे त्यांनी व दोन्ही पचांनी वाचन करुन त्यावर सहया केल्या.

त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे याची पडताळणी करण्यासाठी पंच नं.1 म्हणुन शिंदे व पंच नं.2 म्हणुन पिसे यांनी काम करण्याचे राऊत साहेबांनी ठरवुन मला व पंच नं.1 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डरसह माझ्याकडील दुचाकी वाहनाने पंच नं.1 यांना सोबत घेवुन म्हसवड येथील माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड येथील लोकसेवक जगदाळे यांची भेट घेण्यासाठी म्हसवड येथील माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड येथे जावुन 14:05 वाजता ते 14:30 वाजण्याचे दरम्यान पडताळणी केली असता, पंच नंबर 1 यांचे व माझे हकिकतीवरुन तसेच ध्वनिमुद्रीत संभाषणावरुन माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड कार्यालयातील सचिव श्री.जगदाळे व माझी समक्ष भेट झाली. त्यावेळी सचिव श्री.जगदाळे यांनी मला

माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उपसमिती म्हसवड येथील व्यापारी गाळा भाड्याने देण्यासाठी गाळ्याचे डिपॉझीटचे पाच लाख रुपये त्यापैकी एक लाख रुपये आता लगेच संस्थेच्या नावावर भरणेस सांगुन सचिव श्री.जगदाळे यांचे 50,000/- रुपये रोख लाच रक्कम लगेच आणुन देण्यास सांगुन ती लागलीच स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची आपली व दोन्ही पंचांची खात्री झाली.

पडताळणी कारवाईमध्ये सचिव श्री.जगदाळे यांनी मला माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडीचे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे खात्यामध्ये 1,00,000/- रुपये भरण्यास सांगितले होते, त्याप्रमाणे तसेच आपले सुचनेप्रमाणे मी 1,00,000/- रुपये माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडीचे खात्यावर भरले.

त्यानंतर श्री.राऊत साहेब पोलीस निरीक्षक यांनी सचिव श्री.जगदाळे यांचेवर सापळा कारवाई करणेचे ठरवून मला, सचिव श्री.जगदाळे यांना देण्यासाठी आणलेली लाच रक्कम हजर करण्यास सांगितली असता, मी माझ्या पॅन्टच्या पुढील डाव्या बाजुचे खिशातुन 50,000/- रुपये रोख रक्कम हजर केली. त्या नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन त्यावर आपण व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यावेळी आपण, मला मी माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडीचे खात्यामध्ये 1,00,000/- रुपये बँकेमध्ये डीपॉझीट केलेली रक्कम व हजर केलेली 50,000/- रुपये लाच रक्कम असे एकुण 1,50,000/- रुपये रक्कमेबाबत विचारणा करता, मी सदरची रक्कम ही माझे शेतीचे उत्पन्नातील असल्याचे सांगितले. त्यानंतर राऊत साहेबांच्या सुचनेप्रमाणे पंचांनी माझी अंगझडती घेतली.

त्यानंतर राऊत साहेबांनी व पथकाने त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने राऊत साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवुन पंच नं.1 यांना माझ्या सोबत माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन सचिव श्री.जगदाळे यांची भेट घेण्याकामी म्हसवड येथील माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड येथे रवाना केले.

मी व पंच नं.1 असे माझे दुचाकी वाहनाने निघुन माण कृषि उत्पन्न बाजार समिती दहिवडी उपबाजार म्हसवड कार्यालयाचे समोर पोहचलो. त्या ठिकाणी मी माझेकडील दुचाकी पार्क करुन मी व पंच नं.1 असे जगदाळे, सचिव बसतात त्या खोलीमध्ये गेलो. तेथे जगदाळे, सचिव त्यांचे खुर्चीवर बसले होते. त्यावेळी मी जगदाळे सचिव यांना, "नमस्कार जगदाळे साहेब" असे म्हणालो. त्यावेळी जगदाळे, सचिव यांनी मला हाताने नमस्कार केला. त्यानंतर मी, सचिव जगदाळे यांचे सांगणेप्रमाणे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत 1,00,000/- रुपये भरलेल्याची पावती सचिव जगदाळे यांचेकडे देत, "आम्हाला गाळा कधी भेटणार" असे विचारले. त्यावर सचिव जगदाळे यांनी, "एक महिन्यात आता दोन तीन दिसान चालुच काम" असे म्हणुन मला माझे नाव व गाव तसेच मोबाईल नंबरची माहिती विचारली. त्यावर मी माझे नाव गाव व मोबाईल नंबर सांगितला. त्यानंतर माझे पावतीची झेरॉक्स घेवुन येण्यास सांगितली. त्यानंतर मी व पंच नं.1, पावतीची झेरॉक्स काढण्यासाठी माझे माहिती प्रमाणे म्हसवड शहरामध्ये गेलो. त्या ठिकाणी मी माझेकडील पावतीचे दोन झेरॉक्स काढुन आम्ही परत कृषि उत्पन्न बाजार समितीचे कार्यालयात गेलो. त्यावेळी मी बँकेत पैसे भरलेल्याची पावती व एक झेरॉक्स जगदाळे सचिव यांचेकडे दिली. त्यावेळी जगदाळे सचिव यांनी त्या झेरॉक्स वर पैसे भरल्याचे नमुद करुन आणखी एका कोऱ्या कागदावर संस्थेचे नावे 1,00,000/- रुपये भरलेबाबतची पोहोच पावती भरुन असे दोन्ही कागद मला दिले. त्यावेळी मी सदरचे दोन्ही कागद माझेकडील पॅन्टचे डावे बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर माझेत व जगदाळे सचिव यांचेमध्ये डिपॉझीट हाप्त्या हाप्त्याने भरण्याबाबत चर्चा झाली. त्यावेळी जगदाळे सचिव यांनी, "ती पोहच दिलीय दप्तरी आपली तुच्या निट ठेवा" असे म्हणाले. त्यानंतर मी, "तुम्ही म्हणले त्यात काय कमी करा की, बगा की राव आ तुमच्या हयान" असे म्हणालो. त्यावर जगदाळे सचिव हे, "नाय होणार नाय एक रुपया सुध्दा कमी नाय त्याज्यात, ती पैसे द्यावेच लागतात" असे म्हणुन माझेकडे लाच मागणी केली. त्यावेळी मी, "म्हणजे पन्नास म्हणजे 50 सच, माझ्या मनात काही तरी कमी करायला पाहिजेत" असे म्हणालो. त्यावर जगदाळे सचिव यांनी, "नाय कमी होत नाय तस, तुमाला पन्नास म्हणजे पन्नास" असे म्हणुन माझेकडे 50,000/- रुपयांची लाच मागणी केली. त्यावेळी मी माझे पॅन्टचे पुढील उजव्या बाजुचे खिशातुन 50,000/- रुपये लाच रक्कम काढुन जगदाळे सचिव यांचे समोर धरत, "घ्या मोजुन" असे म्हणालो. त्यावेळी जगदाळे सचिव यांनी ती 50,000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हाताने मोजले. त्यावेळी मी, "आले का तुमचे वरच पन्नास हजार" असे म्हणालो. त्यावर जगदाळे सचिव हे, "हायत हायत हो, जावा बिनधास्त, जावा" असे म्हणाले. त्यावेळी मी, "हा.. बर चालतय" असे म्हणुन लाच रक्कम स्विकारलेचा पुर्वनियोजित इशारा करण्यासाठी कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयाचे बाहेर येवुन माझा डावा हात डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजित इशारा केला. तो इशारा पाहुन आपण, पंच नंबर 2 व सापळा पथक असे माझ्या जवळ येवुन माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन तो बंद केला. त्यावेळी आपण, मला कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालयाचे बाहेर काही अंतरावर थांबुन राहण्यास सांगितले. त्यावेळी श्री. राऊत

साहेब व दोन्ही पंच व पथक असे सचिव श्री. जगदाळे यांना पकडले अवस्थेत घेवुन म्हसवड येथील कृषि उत्पन्न बाजार समिती उपबाजार समिती म्हसवडचे इमारतीमधील कार्यालयामध्ये गेले.

काही वेळाने श्री.राऊत साहेबांनी मला, कृषि उत्पन्न बाजार समितीच कार्यालयात बोलावुन घेवुन माझी अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पेऱ्यास, तळहातास व पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशाचे कडास व आतील बाजुस अंथ्रासिन पावडर लागल्याची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर आपण, मला पॅन्टचे पुढील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेल्या 50,000/- रूपये लाच रकमे बाबत विचारता ती लाच रक्कम सचिव श्री. जगदाळे यांनी मागणी केलेल्याप्रमाणे त्यांना दिल्याचे सांगुन अधिक सांगितले की, लाच रक्कम देण्यापुर्वी सचिव श्री. जगदाळे यांनी माण तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती दहिवडी चे सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा या बँकेमध्ये खाते नं. 1019029000059 या वर भरलेल्या 1,00,000/- रुपयेच्या पावतीची झेरॉक्स आणण्यास सांगुन मुळ पावती सचिव श्री. जगदाळे यांनी स्वत: जवळ ठेवुन त्यांचेकडील रजिस्टरमध्ये त्याबाबत नोंद केली व मला पावतीचे झेरॉक्सवर "व्यापारी संकुल नं.4 मधील गाळा नं.3 चे डिपॉझीट पोटी बँकेत 1,00,000/- रुपये भरलेबाबतची" नोंद करुन दिली. तसेच सदर खात्यामध्ये 1,00,000/- रुपये रोख भरलेबाबतची पोहोच पावती सही करुन दिली असल्याचे सांगुन ते दोन्ही कागद तसेच सापळा कारवाईवेळी लोकसेवक जगदाळे, सचिव यांनी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सातारा या बँकेमध्ये डिपॉझीट रक्कम भरण्यासाठी एका गुलाबी रंगाचे कागदावर "माण तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती दहिवडी, खाते नं. 1019029000059 चालु ठेव खाते" असे लिहुन दिलेला कागद राऊत साहेबांकडे हजर केला. सदरचे कागदपत्रे राऊत साहेबांनी त्यांचे ताब्यात ठेवुन मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले.

त्यानंतर काहीवेळाने श्री. राऊत साहेब यांनी मला पुन्हा कार्यालयात बोलावुन घेवुन पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर राऊत साहेबांनी, माझे व पंच नं.1 शिंदे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणा त्यानंतर काहीवेळाने श्री. राऊत साहेब यांनी मला पुन्हा कार्यालयात बोलावुन घेवुन पंचांसमक्ष माझी अंगझडती घेतली. त्यानंतर राऊत साहेबांनी, माझे व पंच नं.1 शिंदे यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर राऊत साहेबांनी मला सांगितले की, सचिव श्री.जगदाळे यांची कार्यालयात अंधार करुन पंचासमक्ष अंधारात अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हातांची व अंगावरील कपडयांची तपासणी केली असता त्यांचे दोन्ही हाताचे बोटांचे पेऱ्यास व तळ हातास अंथ्रासीन पावडर लागल्याची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच सचिव जगदाळे यांनी माझेकडुन स्विकारलेली लाच रक्कम त्यांचे समोरील टेबलचे उजव्या बाजुचे वरील ड्रावरमध्ये ठेवली असल्याने त्या ड्रावरची कार्यालयात अंधार करुन तपासणी केली असता सचिव श्री. जगदाळे यांचे समोरील टेबलेचे उजव्या बाजुचे वरील ड्रॉवरचे आतील बाजुस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले.

त्यानंतर काही वेळाने पुन्हा कार्यालयामध्ये बोलावुन घेवुन मला हकिकत विचारली, त्यावेळी मी पंच नं.1 यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. सदर बाबत सविस्तर यशस्वी पंचनामा माण कृषि उत्पन्न बाजार समिती दहिवडी उपबाजार म्हसवड कार्यालयात टंकलिखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे.

तरी लोकसेवक 1) रमेश रामभाऊ जगदाळे, वय 56 वर्षे, व्यवसाय - सचिव, माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, दहिवडी, उपबाजार समिती म्हसवड, राहणार- राणंद, ता.माण जि.सातारा यांनी दिनांक 23/11/2022 रोजी पडताळणी कारवाईवेळी मला, माण तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती दहिवडी, उपसमिती म्हसवड येथील व्यापारी गाळा भाड्याने देण्यासाठी माझ्याकडे 50,000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच म्हसवड शहरातील कृषि उत्पन्न बाजार समिती, उपबाजार समिती म्हसवड कार्यालयाचे इमारतीमधील सचिव यांचे कक्षामध्ये 16:15 वाजण्याचे सुमारास स्विकारली आहे. म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखीत केला असुन तो मी वाचुन पाहिला असुन तो बरोबर आहे.

हि खबर दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RAJKUMAR PANDHARINATH BHUJBAL(SI (Sub-Inspector)) / PCMH93597 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAJKUMAR PANDHAI
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): PCMH93597

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**